**<u>भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे प्रकरण २२ अन्वये</u>**

**संक्षिप्त फौ. प्र. क्र. १२६/२०२६**

**निशाणी क्र..........**

**<u>संक्षीप्त संपरिक्षण केलेला अभिलेख</u> –**

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | अपराध घडल्याचा दिनांक | : | १८/०१/२०२६ |
| **२.** | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | १८/०१/२०२६ |
| **३.** | फिर्यादादाराचे नाव, त्याच्या आई व वडिलांचे नाव, त्याचे वय व त्याचे निवासस्थान ईत्यादी | : | महाराष्ट्र शासनतर्फे पोलीस स्टेशन, खापरखेडा. |
| **४.** | आरोपीचे नाव, त्याच्या आई व वडिलांचे नाव, त्याचे वय व त्याचे निवासस्थन ईत्यादी | : | **सुरेश महादेव माकोडे,** वय – ६१ वर्षे, राहणार – नविन बिना, भानेगाव, ता. सावनेर जि. नागपूर |
| **५.** | ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावुन सांगण्यात अपराध आरोपीला समजावुन सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील | : | **कलम १०५/११७ महाराष्ट्र पोलीस अधिनियम.** |

तुम्ही दिनांक १८/०१/२०२६ रोजी १९:३० वाजेच्या सुमारास रेल्वे फाटक जवळ, खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपुर येथे तुम्ही विना परवाना सार्वजनीक रस्त्यावर ग्राहकांना मालाची विक्री करुन येणारे जाणारे रहदारीस अडथळा केला, व त्यामुळे तुम्ही कलम १०५ मुंबई पोलीस कायद्याचा भंग करुन कलम ११७ मुंबई पोलीस कायद्याप्रमाणे अपराध केला आहे आणि म्हणून मी तुमच्यावर **कलम ११७ मुंबई पोलीस कायद्यानुसार** अभियोग चालविण्याचा आदेश देत आहे.

प्रश्न क्र.१ :– तुम्हाला पोलीस नकला मिळाल्या काय ?

उत्तर :– होय.

प्रश्न क्र.२ :– तुमचेवर ठेवलेला आरोप तुम्हाला समजला काय ?

उत्तर :– होय.

प्रश्न क्र.३ :- तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर :- होय.

प्रश्न क्र.४ :- तुम्हाला सरकारतर्फे मोफत सल्लागार पाहिजे काय ?

उत्तर :- नाही.

..................

**आरोपीची सही.** समक्ष,

Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH
Date: 2026.05.09 13:38:45 +0530

(प्रदिपसिंह पृ. ठाकूर)

सावनेर. पॅनल प्रमुख, राष्ट्रीय लोक अदालत,

दिनांकः ०९/०५/२०२६. सावनेर, जिल्हा-नागपुर

**७. साक्षीपुराव्याबाबत अधिटिपण्या**

आरोपीने आपला गुन्हा पुरसिस प्रमाणे कबुल केला आहे व आरोपीने तो आपल्या स्वेच्छेने कबुल केला आहे. आरोपीला गुन्हयाचे परिणाम समजावुन सांगितलेले आहे. आरोपीचा पहिला गुन्हा असल्यामुळे त्याने दंड आकारतांना दयेची विनंती केलेली आहे. अपराधाचे स्वरुप व इतर बाबी विचारात घेवुन माझ्या मते खालील शिक्षा ही न्यायोचीत राहील. म्हणुन खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

आरोपीला महाराष्ट्र पोलीस अधिनीयम कलम १०५/११७ च्या कायद्याप्रमाणे दोषी ठरवुन रु.५००/- (रुपये पाचशे फक्त) दंड ठोठाविण्यात येत आहे आणि दंड न भरल्यास ०२ दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागले असे आदेशीत करण्यात येत आहे.

Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH
Date: 2026.05.09 13:38:50 +0530

(प्रदिपसिंह पृ. ठाकूर)

सावनेर. पॅनल प्रमुख, राष्ट्रीय लोक अदालत,

दिनांकः०९/०५/२०२६. सावनेर, जिल्हा-नागपुर